**शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा**
**<u>पडताळणी अहवाल......</u>**

ग्रंथालय संचालनालय
म. राज्य, मुंबई
आवक क्रमांक ७ee
दिनांक 22/03/2013
कार्या 3

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
शासन निर्णय क्र. मराग्रं -२०१२/प्र.क्र.२५६/साशि-५,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २२ मार्च,२०१३.

वाचा : १) शासन निर्णय, क्र. एलआयबी १०९६/७५/(८०)साशि-५, दिनांक २२ जानेवारी १९९८
२) शासन निर्णय, क्र. मराग्रं १००१/ (४१२) साशि-५, दिनांक १ ऑगस्ट २००२
३) शासन निर्णय, क्र. मराग्रं १००३/२२९/(११३/०३)साशि-५, दिनांक १३ में. २००४
४) शासन निर्णय क्र. मराग्रं १००४/(१२६/०४)साशि-५, दिनांक ९ मार्च, २००५
५) शासन निर्णय क्र. मराग्रं २००९/प्र.क्र.२३६/साशि-५, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२
६) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.३२/पडताळणी/२०१२-१३/६६९७ दि.२२.०८.२०१२

**<u>प्रस्तावना</u>** : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ अंतर्गत तरतुद्दीनुसार करण्यात आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील तरतुदींनुसार, स्वतंत्र नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता व सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येते.

दि.२८.१२.२०११ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयाच्या आधारे, शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुज्ञेय असलेल्या परिरक्षण अनुदानात दि.०१.०४.२०१२ पासून, विद्यमान दराच्या ५०% वाढ करण्याचा शासन निर्णय उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये मुख्यत: सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची सर्वंकष पडताळणी, महसूल यंत्रणेकडून करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल मंत्रिमंडळासमोर सादर करावा आणि तोपर्यंत कोणत्याही नवीन ग्रंथालयांना मान्यता, दर्जोन्नती व वाढीव ५०% अनुदान देण्यात येऊ नये, असे मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार नमूद करण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन मा.मुख्य सचिवांच्या दिनांक २०.०४.२०१२ च्या अर्धशासकीय पत्रान्वये राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची पडताळणी दि. २१ मे, २०१२ ते २५ मे, २०१२ या कालावधीत महसूल यंत्रणेकडून करण्यात आली. ३१ मार्च २०१२ अखेर असणाऱ्या १२८६१ ग्रंथालयांपैकी महसूल यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या १२८४६ ग्रंथालयांच्या पडताळणी अहवालाच्या छाननीअंती खालील बाबी निदर्शनास आल्या :-

का-2
सर्व ADL
2013

१) ५७८४ ग्रंथालये निकषांप्रमाणे सर्व अटीं व शर्तीची पूर्तता करीत असल्याचे आढळून आले.

२) ५७८८ ग्रंथालये सूचना देऊन सुधारणा होण्यायोग्य असल्याचे आढळून आले.

३) ३६० ग्रंथालये दर्जावनत करण्यायोग्य असल्याचे आढळून आले.

४) ९१४ ग्रंथालये मान्यता रद्द करण्यायोग्य असल्याचे आढळून आले.

त्यानुसार, शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा पडताळणी अहवाल, दिनांक ६ मार्च, २०१३ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णयार्थ सादर झाला होता. सदर बैठकीत मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या आधारे, उपरोक्त संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :-

दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२ चा शासन निर्णय व ग्रंथालय संचालनालयाने शासनास सादर केलेल्या पडताळणी अहवालाबाबत, दिनांक ६.३.२०१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी-

अ) सर्व अटीं व शर्तींची पूर्तता करीत असलेल्या व पडताळणीअंती किमान अपेक्षेने कार्यरत असलेल्या ५७८४ ग्रंथालयांना चालू वर्ष २०१२-१३ पासून नियमित अनुदानासह ५०% वाढीव अनुदानास पात्र राहतील

ब) त्रुटी आढळून आलेल्या ५७८८ ग्रंथालयांना, त्रुटींची पूर्तता करण्याकरीता ३ महिन्यांच्या कालावधी देण्यात यावा व त्यानंतर फेरतपासणी करुन प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा.

क) दर्जावनत करण्यायोग्य असल्याचे आढळून आलेल्या ३६० ग्रंथालयांचा दर्जावनत करण्यात यावा आणि त्यानुसार ५०% वाढ लागू करण्यात यावी.

ड) मान्यता रद्द करण्यायोग्य आढळून आलेल्या ९१४ ग्रंथालयांची नियमातील तरतुदींनुसार/विहित पध्दतीने मान्यता रद्द करण्यात यावी.

इ) मंत्रिमंडळाचे पुढील आदेश होईपर्यंत कोणत्याही नवीन ग्रंथालयाला मान्यता देवू नये व दर्जावाढ करु नये. त्याबाबत नवीन निकष ठरवून सर्वंकष प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा

फ) यापुढे प्रत्येक ग्रंथालयाला युआयडीचा वापर करणे अनिवार्य असेल.

ग) ग्रंथालयांच्या कामकाजाबाबत संबंधित गावातील ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक/ग्रामविस्तार अधिकारी व प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडून ग्रंथालय, ग्रामस्थांना ग्रंथालयीन सेवा देत असल्याबाबतचा अहवाल प्रमाणित करुन, ग्रंथालयाने संबंधित जिल्ह्याच्या ग्रंथालय अधिकाऱ्याकडे दरमहा पाठविणे अनिवार्य असेल. तसेच त्या अहवालात स्थानिक शाळेच्या विद्यार्थ्यांनाही, ग्रंथालय सेवा देत आहे, याबाबत स्थानिक प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकाकडून माहिती प्रमाणित करुन घेण्यात घ्यावी.

ह) दि. २१.०२.२०१२ च्या शासन निर्णयातील, वित्त विभागाकडून सूचित अटी म्हणजेच

वर्गणीदार/वृत्तपत्रे/नियतकालिके यांची वाढीव संख्येबाबतची अट चालू वर्ष २०१२-१३ मध्ये लागू करण्यात येऊ नये. सदरच्या अटी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ च्या तरतुदींनुसार व गतवर्षी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार नियमामध्ये रितसर समाविष्ट करण्याची वैधानिक पध्दतीने कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पुढील वर्षात म्हणजेच सन २०१३-१४ पासून लागू करावी.

तसेच ग्रंथालय संचालकांनी सदर अटींचा समावेश नियमामध्ये होण्याच्यादृष्टीने पुढील आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

२. हे आदेश सन २०१२-१३ या वर्षापासून लागू राहतील.

३. सदरचे आदेश मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( बा.ओं. हेमाडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा ) मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मा.मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, }
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा, }(ग्रंथालय संचालनालयामार्फत)
सर्व सहाय्यक ग्रंथांलय संचालक/ ग्रंथपाल, सर्व शासकीय विभागीय ग्रंथालये/ }
ग्रंथपाल, सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालये, }
अध्यक्ष, सर्व राज्य, विभाग व जिल्हा ग्रंथालय संघ, }
मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, मुंबई
सर्व जिल्हा कोषाधिकारी / उप कोषागार, नवी मुंबई
वित्त विभाग (व्यय-५) (अर्थसंकल्प-३)/ नियोजन विभाग (१४२३/१४७१)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबइ